1) लोकमत पु. पान क्र. 4 दि. 02/03/2023

# पायी जाताय? उजव्या बाजूने चाला, अपघातांना आळा घाला

## स्वयंशिस्त पाळणे आवश्यक : नियम आणि वेगावर हवे नियंत्रण

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अपघात टाळण्यासाठी वाहनचालकांनी वेगमर्यादेचे भान ठेवून वाहतुकीचे नियम पाळले पाहिजेत तेच नागरिकांनीही पायी चालताना व रस्ता ओलांडताना स्वतःची जबाबदारी ओळखून स्वयंशिस्त बाळगली पाहिजे. अन्यथा बेशिस्त अपघातांना कारणीभूत ठरते.

मीरा-भाईदरमध्ये जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२३ या १३ महिन्यात घडलेल्या रस्ते अपघातांची संख्या, मृत्यू व जखमींचा आकडा चिंताजनक आहे. राष्ट्रीय महामार्गापेक्षा अंतर्गत रस्त्यांवर घडलेले अपघात, मृत्यू व जखमींची आकडेवारी जास्त आहे. वाहनांची एकमेकांना धडक देणे, भरधाव वाहन घसरून, पायी चालताना नागरिकास वाहनाने धडक दिल्याने होणारे अपघात या आकडेवारीत समाविष्ट आहेत. अपघातात काहींना तर कायमचे अपंगत्व आले आहे. वेगावर मर्यादा आणि वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांत बळी जाणे थांबतील.




### चालताना अपघात होण्याची कारणे

नागरिक पायी चालताना पदपथाचा वापर करत नाहीत. रस्त्यावरून चालतात. चालताना मोबाइलवर बोलत असतात वा अन्य कारणांत दंग असतात. आवश्यक खबरदारी घेत नाहीत. रस्ता ओलांडताना सिग्नल व झेब्रा क्रॉसिंगचा वापर करत नाहीत. धोकादायक शॉर्टकटचा वापर करतात.

### ३१ जणांचा मृत्यू, १७९ जखमी

१३ महिन्यांतील अपघातात ३१ जणांचा मृत्यू तर १७९ जण जखमी झालेले आहेत. त्यात मृत्यूचे प्रमाण केवळ शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय व राज्य महामार्गावरच नाही. तर अंतर्गत रस्त्यांवरही अपघात आणि त्यातील बळी व जखमींची संख्या जास्त आहे.

### १३ महिन्यांत शहरात २२६ अपघात


जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२३ या १३ महिन्यांत मीरा-भाईदरमध्ये २२६ अपघात घडले आहेत. शहरातील घोडबंदर व मुंबई-अहमदाबाद महामार्गापेक्षा अंतर्गत रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण जास्त आहे.

### चालताना काय काळजी घ्याल?

पायी चालताना पदपथाचा वापर करावा. मोबाइलवर बोलत वा सोबत असणाऱ्यांसोबत गप्पा मारत रस्त्यातून चालू नये. रस्ता ओलांडताना आजूबाजूच्या दिशेने येणाऱ्या वाहनांचा अंदाज घ्यावा तसेच घाईगडबड न करता संयम बाळगावा व दक्ष राहावे. सिग्नल व झेब्रा क्रॉसिंगचा वापर करावा. उजव्या बाजूने चालल्यास समोरून येणारी वाहने दिसतात.

वाहनचालकांनी वाहनांचा वेग मर्यादित ठेवला पाहिजे. दुचाकीस्वारांनी हेल्मेट घातले पाहिजे. नागरिकांनी चालण्यासाठी पदपथाचा व सुरक्षित लेनचा वापर केला पाहिजे. वाहतूक शाखेमार्फत सातत्याने जनजागृतीसह बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई केली जाते.

\- देविदास हंडोरे, पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, मीरा-भाईदर



2) पुण्यनगरी पु. पान क्र. 4

# बसचालकाला ठेकेदाराच्या मुलाकडून चोप

**। मीरा रोड ।** मीरा भाईंदर महापालिका परिवहनच्या बसचालकाला कट का मारला, असे बोलून ठेकेदाराच्या मुलाने मारहाण केली. मारहाण झाल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर काही वेळात परिवहनचे चालक, वाहक एकत्र आले. त्यांनी या घटनेच्या निषेधार्थ परिवहनच्या भाईंदर, मीरा रोड, भाईंदर पश्चिम अशा बसेस बंद केल्या. त्यांनी मीरा रोड पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या गेविन



बोर्जीस याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.. पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. दरम्यान, सायंकाळच्या वेळेस अचानक बस बंद झाल्याने प्रवासी त्रस्त झाले होते. मीरा भाईंदर परिवहन विभागाची मीरा रोड स्टेशन ते विनयनगर ही १७ नंबरची बस विनय नगरला जात होती. बस एस के स्टोन येथे आली असता पाठीमागून दुचाकीवरून गेवीन बोर्जीस आला. बस थांबवून त्याने चालकाला खाली उतरवले. मला कट का मारला, असे बोलून चालक रामेश्वर बिडवे यास मारहाण केली.

CamScanner
Scanned with CamScanner

३) पुढारी पू. पान क्र. 2 दि. 02/03/2023

# पोलिसांच्या बुथमुळे अपघातांची शक्यता

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील मॅकडोनाल्ड सिग्नलजवळ मेट्रोचे काम सुरू असलेल्या धोकादायक ठिकाणी काशिमीरा वाहतूक पोलिसांचा बूथ ठेवण्यात आला आहे. त्या बूथमध्ये बसून वाहतूक पोलीस त्यांचे कर्तव्य बजावत असल्याने मेट्रो कामाच्या दरम्यान भविष्यात त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. तेथे मेट्रोचे कामाचे साहित्य पडले, तर कोणताही अपघात किंवा एखादी घटना घडली तर त्यात वाहतूक कर्मचारी व इतर कोणाला मोठी इजा होऊ शकते. त्यामुळे तो बूथ हटवण्याची मागणी केली जात आहे.

> फुटपाथवरून चालणाऱ्या पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होऊ नये यासाठी बूथ त्या ठिकाणी ठेवण्यात आला. बूथमध्ये कोणताही कर्मचारी बसून काम करणार नाही याची दक्षता घेतली जाईल.
>
> **- देवीदास हंडोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक**




छत्रपती शिवाजी महाराज हा मार्ग काशिमीरा ते भाईंदर गोल्डन नेस्टपर्यंत जाणारा मुख्य रस्ता आहे. या रस्त्यावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. या रस्त्यावर गेल्या दोन-तीन वर्षांपासून मेट्रोचे काम सुरू आहे. त्यामुळे नेहमीच वाहतूककोंडी असते. मॅकडोनाल्ड सिग्नल नेहमीच वाहतुकीच्या वर्दळीचा आहे. हा सिग्नल जवळच रस्त्यात वाहतूक पोलिसांचा बूथ असल्याने वाहन चालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करत नाहीत. यामुळे रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना त्रास होत नाही व अपघाताची सुद्धा शक्यता कमी आहे. या रस्त्यावरील मॅकडोनाल्ड सिग्नल जवळ रस्त्याच्या कडेला असणारा वाहतूक पोलिसांचा बूथ गेल्या काही दिवसांपासून उचलून मेट्रोचे काम सुरू असणाऱ्या धोकादायक ठिकाणी ठेवण्यात आला.

४) लोकमत पान क्र. ८

# पोलिस चालानसह वाहनांचा ऑन द स्पॉट विमाही काढणार

## केंद्र सरकार मोटार वाहन विमा नियमांमध्ये बदल करण्याच्या तयारीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील महामार्गावर धावणाऱ्या वाहनांपैकी तब्बल ५० टक्के वाहने थर्ड पार्टी इन्शुरन्सशिवाय धावत आहेत. आता केंद्र सरकार या विमा नसलेल्या वाहनांसाठी ऑन द स्पॉट विमा काढण्याची तयारी करत आहे.

केंद्र सरकारच्या योजनेनुसार, वाहतूक पोलिस विमा नसलेली वाहने जेव्हा पकडतील, तेव्हा त्यांच्या चालानसह वाहनांचा ऑन द स्पॉट थर्ड पार्टी विमाही काढला जाईल. वाहन मालकाच्या फास्टॅग खात्यातून विमा प्रीमियमची रक्कम कापली जाईल. त्यामुळे बेजाबदार वाहनधारकांना एकाच वेळी दोन दणके बसणार आहेत.



### ॲपवरून माहिती काढणार

**१** सरकार अशी एक प्रणाली बनवत आहे, ज्याअंतर्गत पोलिस आणि वाहतूक विभागाचे अधिकारी महामार्ग मंत्रालयाच्या वाहन ॲपच्या मदतीने हातातील उपकरणातून वाहनांची संपूर्ण माहिती काढतील.

**२** जर वाहनाचा विमा उतरवला नसेल, तर परिवहन विभागाच्या नेटवर्कशी जोडलेल्या सामान्य विमा कंपन्यांकडून लगेच पॉलिसी खरेदी करण्याचा पर्याय असेल.

### किती आहे थर्ड पार्टी विमा प्रीमियम?

| | वाहन क्षमता | रुपये |
|---|---|---|
| बाईक | १५० सीसीपर्यंत | ७१४ रुपये |
| | १५०-३५० पर्यंत | १,३६६ रुपये |
| | ३५० पेक्षा अधिक | २,८०४ रुपये |
| कार | १००० सीसी | २,०९४ रुपये |
| | १०००-१५०० | ३,४१६ रुपये |
| | १,५०० पेक्षा अधिक | ७,८९७ रुपये |
| ई वाहने | ३० किलोवॅटपर्यंत | १७८० रुपये |
| | ३०-६५ किलोवॅट | २९०४ रुपये |
| | ६५ केव्हीपेक्षा अधिक | ६,७१२ रुपये |

**५०%** वाहनांचा देशात वाहन विमाच नसतो. तरीही ती रस्त्यावर धावत आहेत.

**१०** पैकी १ म्हणजेच जगभरातील १० टक्के रस्ते दुर्घटनांमध्ये मृत्यू होणारे भारतीय वाहनचालकच आहेत.

**१७** मार्च रोजी होणाऱ्या जनरल इन्शुरन्स कौन्सिलच्या बैठकीत याबाबतचा निर्णय होणार आहे.



**बँक-विमा कंपन्याही फास्टॅग प्लॅटफॉर्मवर।**

- फास्टॅग शिल्लकमधून विमा प्रीमियम वजा करून ऑन द स्पॉट मोटार विमा पॉलिसीसाठी त्वरित प्रीमियम भरण्यासाठी बँकांना तसेच विमा कंपन्यांना फास्टॅग प्लॅटफॉर्मवर आणले जाऊ शकते.
- जनरल इन्शुरन्स कौन्सिल (जीआयसी)च्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, कौन्सिलच्या बैठकीत स्पॉट इन्शुरन्सवरही चर्चा झाली. आता त्याच्या अंमलबजावणीसाठी शिफारशी तयार केल्या जात आहेत. १७ मार्चच्या बैठकीत यावर चर्चा होणार आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पान क्र. 4

दि. 02/03/2023

(5)

# कर्ज असूनही विकले घर, मोलकरणीला गंडविले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : बँकेचे कर्ज असलेले घर विकून घरकाम करणाऱ्या महिलेची फसवणूक करणाऱ्या महिलेविरोधात भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मूळ कागदपत्रे बँकेकडे असताना बनावट कागदपत्रांच्या आधारे हा व्यवहार पूर्ण करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

भाईंदरच्या सुनंदा सोहान या घरकाम करून कुटुंब चालवतात. चार वर्षांपूर्वी कमलेश शाह आणि संजय तिवारी या इस्टेट एजंटनी त्यांना हे भाड्याचे घर मिळवून दिले होते. सुनंदा ज्या घरात भाड्याने राहत होत्या, त्या घराच्या मूळ मालक रेणुका पटेल व तिचा पती दिनेशकुमार यांना ते घर विकायचे होते. घर खरेदी करण्याची सुनंदा यांनी तयारी दर्शविल्यानंतर ९ लाख ५० हजारांत व्यवहार ठरला. सुनंदा यांनी तीन लाखांची अनामत रक्कम दिली होती. उर्वरित सहा लाख ५० हजार थोडेथोडे करून त्यांनी दिले. मात्र काही दिवसांनी बसिन कॅथॉलिक बँकेच्या कर्मचाऱ्यांनी घरावर ७ लाख १५ हजारांचे कर्ज असल्याचे सांगितले.

(6)

# मीरा रोडमध्ये पाकच्या क्रिकेट सामन्यांवर सट्टा

## दोघांवर गुन्हा : पाच लाखांचा मुद्देमाल जप्त



लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडच्या प्लेझंट पार्क भागात एका चारचाकी मोटारीतून पाकिस्तान सुपरलीगच्या क्रिकेट सामन्यावर सट्टा चालविण्यात येत असल्याचे काशिमीरा पोलिसांच्या कारवाईत उघडकीस आले. केविन शाह आणि मनीष चोटी ऊर्फ संकेत यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. मोटार व मोबाइल असा पाच लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

सट्टा खेळणाऱ्यांना आयडी व पासवर्ड देत असल्याचे त्याने सांगितले. अंधेरीच्या मनीष याने पासवर्ड व आयडी देण्याची वितरण एजन्सी मिळवून दिल्याचे त्याने सांगितले. यात केविन व मनीष यांचा सहभाग असल्याचे उघड झाले. दरम्यान, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रकाश कावरे, नीलेश शिंदे, सचिन हुले, सुधीर खोत व राहुल सोनकांबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

(7)

# घराचा ताबा घेण्यास गेले, लाइट घालवून मारले

## महसूल कर्मचाऱ्यास मारहाण, अद्याप गुन्हा दाखल नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : जिल्हा दंडाधिकारी ठाणे यांनी दिलेल्या आदेशानुसार मीरा रोडच्या नयानगरमधील एका सदनिकेचा ताबा बँकेला देण्यास गेलेले अव्वल कारकुन यांना दोघांनी मारहाण केल्याची घटना बुधवारी घडली. संपूर्ण इमारतीतील आणि घरातील वीज घालवून मारहाण करण्यात आली. विशेष म्हणजे ते पोलिस बंदोबस्तात सदनिकेचा ताबा घेण्यासाठी गेले होते.

मीरा रोडच्या नयानगर भागातील अस्मिता सुपर मार्केटसमोर असलेल्या सलमा इमारतीत अब्दुल रहमान शेख यांची ३०३ क्रमांकाची सदनिका आहे. एका प्रकरणात ही मालमत्ता जप्त करून तिचा ताबा भारत सहकारी बँकेला देण्याचे आदेश ठाणे जिल्हादंडाधिकारी यांनी १३ फेब्रुवारीला दिले होते. त्यानुसार अपर तहसीलदार कार्यालयाचे अव्वल कारकून प्रशांत कापडे नयानगर पोलिसांनी दिलेल्या एक महिला व एक पुरुष पोलिसांचा बंदोबस्त घेऊन सदनिकेच्या ठिकाणी गेले. त्यावेळी घरात तीन पुरुष व तीन-चार महिला होत्या.

### तोंडावर रुमाल बांधून आले दोघे



जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे आदेश असल्याचे सांगून घर रिकामे करण्यास वेळ दिला. मात्र, सायंकाळी ७:३० च्या सुमारास आधी सदनिकेतील व नंतर इमारतीतील वीज बंद करण्यात आली. त्यानंतर तोंडावर रुमाल बांधून आलेल्या दोघांनी कापडे यांना छातीत व कानावर मारले. यावेळी पोलिसांनाही धक्काबुक्की झाल्याचे सांगण्यात आले. अद्याप याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला नाही.

8) लोकमत पान क्र. 5

# चाकूने जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : तरुणीसोबत संबंध असल्याच्या संशयावरून नालासोपाऱ्यातील समेळपाडा येथे १८ जानेवारीला आरोपीने एका २४ वर्षीय तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती. नालासोपारा पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. तेव्हापासून फरार असलेल्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. कळवा येथील अजय वडियार (२४) हा तरुण समेळपाड्याच्या अशोकनगर येथील अथर्व रेसिडेन्सीमध्ये राहणाऱ्या मैत्रिणीकडे आला होता. संध्याकाळी गणेश राजदेव तेथे आला व अजयच्या डाव्या बाजूला चाकू भोसकला होता. तसेच चाकूने वारही केले होते.

CamScanner
Scanned with CamScanner

९) म.टा. पान क्र.।

दि. 02/03/2023

# उच्च न्यायालयात मराठीत न्यायनिवाडे

## संकेतस्थळावर 'निवडक निर्णय' शीर्षकाखाली महत्त्वाची निकालपत्रे

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**




मुंबई उच्च न्यायालयातही स्थानिक भाषेत न्यायालयीन कामकाज व्हावे आणि आदेश व निकालपत्रेही मराठी भाषेत उपलब्ध व्हावेत, अशी मागणी जोर धरत असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी आपल्या संकेतस्थळावर 'निवडक निर्णय' या शीर्षकाखाली तीन महत्त्वाची निकालपत्रे मराठीत भाषांतरित स्वरूपात प्रसिद्ध केली. त्यामुळे आता उच्च न्यायालयातील महत्त्वाचे न्यायनिवाडे मराठी भाषेत उपलब्ध होतील आणि इंग्रजी भाषेमुळे अडचण असलेल्या पक्षकार व सर्वसामान्य नागरिकांनाही त्याचा उपयोग होईल, अशी प्रतिक्रिया न्यायवर्तुळात उमटली.

न्या. डी. एच. ठाकूर व न्या. कमल खाटा, न्या. डी. एच. ठाकूर व न्या. अभय अहुजा आणि न्या. अजय गडकरी व न्या. प्रकाश नाईक या तीन खंडपीठांची निकालपत्रे मराठीत भाषांतरित स्वरुपात उपलब्ध करण्यात आली आहेत. मात्र, त्याचवेळी 'या निकालपत्रांचा उपयोग केवळ पक्षकारांना त्यांच्या मातृभाषेत तो समजावा, याअनुषंगाने करावा. अन्य कोणत्याही कारणासाठी करण्यात येऊ नये. उच्च न्यायालयाच्या निकालपत्रांसाठी अधिकृत भाषा ही यापुढेही इंग्रजीच राहील', असे स्पष्टीकरणही करण्यात आले आहे. bombayhighcourt.nic.in या संकेतस्थळावर आता निवडक निवाडे मराठीत उपलब्ध होणार आहेत.

देशाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रांचे भाषांतर प्रादेशिक भाषांत उपलब्ध होण्याची सेवा जानेवारी महिन्यात सुरू केली. तसेच राज्यांतील उच्च न्यायालयांनीही प्रादेशिक भाषेत निकालपत्रे उपलब्ध करावीत, असा आग्रह व्यक्त केला. केरळ उच्च न्यायालयाने अलीकडेच निकालपत्रे मल्याळममध्ये प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे.

### 'महाराष्ट्र टाइम्स'नेही वेधले होते लक्ष

२७ फेब्रुवारीच्या मराठी दिनाच्या औचित्याने 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये 'संवाद' पुरवणीत 'माय मराठी न्याय मराठी' या विशेष लेखाच्या माध्यमातून उच्च न्यायालयातील मराठी भाषेच्या आवश्यकतेचा वेध घेण्यात आला. उच्च न्यायालयात वकिली करणारे अॅड. अनिरुद्ध गर्गे यांनी औरंगाबाद खंडपीठामध्ये याबाबत झालेले प्रयत्न नमूद करतानाच त्याचे अनुकरण होण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच यातील व्यवहार्य अडचणींचाही वेध त्यांनी लेखात घेतला.

१०) लोकसत्ता पु. पान क्र.३

# ऑर्केस्ट्रा बारवर छापा

**भाईंदर :** ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली महिलांकडून अश्लील नृत्य करून घेणाऱ्या मेमसाब बारवर मंगळवारी भाईंदरच्या अनैतिक मानवी प्रतिबंध विभागाने छापा टाकला. याप्रकरणी बार मालकाविरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

दहिसर चेकनाक्याजवळ असलेल्या मेमसाहब या ऑर्केस्ट्रा बारमध्ये डान्स बार सुरू असल्याची माहिती भाईंदरमधील अनैतिक मानवी प्रतिबंध विभागाला मिळाली होती. त्यामुळे याची खात्री करून घेण्यासाठी पोलीस निरीक्षक समीर अहिराव यांनी खोटे गिऱ्हाईक पाठवून बारमध्ये सुरू असलेल्या नृत्याचे चित्रीकरण मिळवले. यात गायक म्हणून ठेवलेल्या महिला नृत्य करत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मंगळवारी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास थेट बारवर छापा टाकला.

या कारवाईत बारमालक अब्दुल करीम शेख व इतर पुरुष कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन महिलांना नृत्य करण्यास प्रवृत्त केल्यामुळे काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हाची नोंद केल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाने परिपत्रकद्वारे दिली आहे.

११) सकाळ पु. पान क्र. ३

# वाहनचोरी टोळीचा विरारमध्ये भांडाफोड

नालासोपारा, ता. १ (बातमीदार) : वसई-विरार नालासोपारा परिसरात वाहन चोरी व जबरी चोरी करून फरारी होणाऱ्या टोळीला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखा कक्ष तीनचे विरारचे प्रभारी पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. या टोळीतील ३ चोरट्यांना अटक करण्यात आले आहे. त्यांच्याकडून वाहन चोरीतील चार लाख ५५ हजार आणि इतर चोरीतील एक लाख ३३ हजार ५०० रुपये असा ५ लाख ८८ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरट्यांनी वाहन चोरीच्या सहा आणि जबरी चोरीचे तीन असे नऊ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

रईस शेख (वय २६) असे वाहन चोरी करणाऱ्या आरोपीचे नाव असून हा विरार पूर्व चंदनसार तांदूळ बाजार परिसरातील राहणारा आहे. याने विरारमध्ये चार, वालीवमध्ये एक आणि नालासोपारा पोलिस ठाणे क्षेत्रातील हद्दीत एक असे सहा गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. संजू पाटील (वय २५), अमीर शेख (वय २२) असे जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांची नाव असून या दोघांनी विरार आणि पेल्हार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून एक लाख ३३ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत

# रस्त्यांवर पायी जाताय? अपघात टाळण्यासाठी उजव्या बाजूने चाला

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वाहनचालकांकडून वाहनांचा वाढता वेग बहुतांश वेळा संबंधित वाहनचालकांच्याच जीवावर बेतल्याचे आपण बघतो. स्वतःच्या बेमुर्वतपणामुळे स्वतःचा जीव जाण्यासोबतच अनेक निरपराध लोकांचाही बळी जात असल्याचेही वारंवार दिसून येते. दरम्यान, रस्त्यांवर पायी चालताना अपघात टाळण्यासाठी उजव्या बाजूने चालणेच श्रेयस्कर आहे.

वसईत रस्ते अपघातांत निरपराध पादचारी अर्थात फुटपाथवरून किंवा रस्त्याच्या कडेने पायी चालणाऱ्यांचा जीव गेला आहे, तर काही नागरिक गंभीररीत्या जखमी झाले आहेत. कधी रस्ता ओलांडताना, तर कधी रस्त्याच्या कडेने जाताना बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या चालकांमुळे पादचाऱ्यांना जीव गमवावा लागत आहे.

हायवे असो किंवा महापालिकेचे रस्ते, सर्वच ठिकाणी पादचाऱ्यांचा विचार करण्यात आलेला नाही. काही ठिकाणी तर दुकानदारांनी फुटपाथ अडवले आहेत.




## ११२ जणांचा मृत्यू; १४७ जण जखमी



वसई तालुक्यात मागील वर्षाच्या कालावधीत झालेल्या अपघातात ११२ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १४७ जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात २५ टक्के निष्पाप आणि रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांचा मृत्यू झालेला आहे.

## वर्षभरात शहरात २५९ अपघात

वसई तालुक्यात मागील वर्षाच्या कालावधीत २५९ अपघात झाल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली आहे. मुंबई - अहमदाबाद महामार्गावर रात्रीच्या वेळी अंधारात रस्ता क्रॉस करताना किंवा रस्त्यावरून पायी चालणाऱ्या पादचाऱ्यांचा भरधाव वेगातील वाहने धडक किंवा ठोकर मारून अपघात करतात.

## पायी चालताना अपघात होण्याची कारणे

- वसई-विरार महापालिका हद्दीमध्ये बहुतांश रस्त्यांवरील फुटपाथवर फेरीवाल्यांनी कब्जा केलेला आहे.
- त्यामुळे नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथच शिल्लक राहिलेले नाहीत, अशी स्थिती आहे.
- यामुळे दिवसा किंवा रात्रीच्या वेळी या टँकरच्या अपघातात पायी चालणाऱ्यांचा मृत्यू झालेला आहे.

## पायी चालताना काय काळजी घ्याल?

- चालताना काही पथ्ये पाळली तर काही अपघात टळू शकतात.
- **पायी चालणाऱ्यांनी रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे.**
- त्यामुळे समोरून येणारी वाहने दिसतात. पादचाऱ्यांनीदेखील चालण्याची शिस्त पाळली पाहिजे. योग्य पद्धतीनेच रस्ता ओलांडला गेला पाहिजे.

राष्ट्रीय महामार्गालगत अनेक आस्थापना आहेत. तेथील अनेक पादचारी महामार्ग ओलांडत असतात. त्यांनीदेखील नजीकच्या ओव्हरब्रिज वापर करून रस्ता ओलांडला पाहिजे. रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्याने रस्ता ओलांडणारे पादचारी वाहन जवळ जाईपर्यंत दिसून येत नाहीत.

**- सागर इंगोले**, पोलिस निरीक्षक, वसई परिमंडळ-२, वाहतूक विभाग



Hello Vasai
Page No. 3 Mar 02, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# मीरा-भाईंदर शहरात चारशेहून अधिक ठिकाणी होळींचे आयोजन

भाईंदर - होळी हा सण पारंपरिक असल्यामुळे तो सण महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येतो. प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने होळीचा सण साजरा करत असतो. मीरा-भाईंदर शहरात मोठ्या उत्साहात होळी साजरी केली जाते.

मीरा-भाईंदर शहरात सार्वजनिक ठिकाणी एकूण २२९ होळी व खासगी ठिकाणी १६५ होळीचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आतापर्यंत पोलीस आयुक्तालयात परवानगी करता प्राप्त झालेल्या अर्जावरून आयुक्तालयाच्या मार्फत देण्यात आली आहे. सदर वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता पोलीस दल सतर्क असणार असल्याचे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे. होळीचा सण शांततेत पार पडावा याकरता अनेक उपाययोजना देखील राबवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. होळी सण साजरा करण्याबाबतच्या नियमावलीचे परिपत्रक लवकरच काढण्यात येणार आहे. आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हे त्यांच्या हद्दीत होळी सणाचे आयोजन करणाऱ्या सर्वांना एकत्र बोलावत होळी व धुलीवंदन सण शांततेत पार पाडण्यासंदर्भात आयोजकांची लवकरच बैठक घेणार आहेत. त्याचबरोबर होळी व धुलीवंदन सणाकरिता शहरात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# वसईत लाखोंचे मॅफेड्रॉन जप्त

नालासोपारा : वसईत मॅफेड्रॉन हा अमली पदार्थ जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर रॉयल हिल हॉटेल समोर सोमवारी रात्री नऊच्या सुमारास धर्मेश बाबर हरिजन (२२) या तरुणाच्या ताब्यात पोलिसांना खडे व खडे मिश्रित पावडर असा सहा ग्रॅम वजनाचा १ लाख २० हजार रुपये किमतीचा मॅफेड्रॉन हा अमली पदार्थ आढळून आला होता. मंगळवारी वालीव पोलिसांनी एनडीपीएस ॲक्ट खाली गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Mar 02, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner